# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ११/१०/२०२२ (मंगळवार)**

**(सकाळ)**

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. काटोल :—** अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील बाजार चौक काटोल येथे दिनांक १०/१०/२०२२ चे १७.०० वा. ते १७.३० दरम्यान फिर्यादी नामे— प्रभुदयाल रामदिन राठोड, वय ५८ वर्ष, रा.कर्ताकापुर जनोना उत्तरप्रदेश ह.मु.सरस्वती नगर काटोल ता.काटोल, संतोष कुशवाह यांचे घरी किरायाने हे काटोल बाजारामध्ये भाजीपाला व किराणा सामान घेण्यास गेले व ते भांगे यांचे किराणा दुकानात किराणा सामान घेण्यास जात असतांना भांगे यांचे किराणा दुकानासमोर आरोपी नामे— राम उर्फ रामराव ज्ञानेश्वर डोईजोड, वय ५० वर्ष, रा. अण्णाभाउ साठे नगर, काटोल हा फिर्यादी जवळ जावून 'तु मला दुपारी १५.०० वा. का म्हटले' असे म्हणुन फिर्यादीचा जिव घेण्याचा ईरादयाने चाकुने गळयावर व डोक्यावर मारहाण करून गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३०७ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि जवाहर चव्हाण मो.क्र. ९५४५३६३१२१ हे करीत आहे.

### जबरी संभोग

**पो.स्टे. मौदा :—** दिनांक ०९/१०/२०२२ चे ११:३० वा. ते ११.५० वा. चे सुमारास वय ३४ वर्षीय पीडित/फिर्यादी हिला आरोपी नामे— सतीश कृष्णाजी जौंजाळकर, रा. जयस्तंभ चौक, मौदा याने फिर्यादीच्या मोबाईल क्रमांकावर फोन करून 'तु मला भेटायला ये' असे म्हटले असता फिर्यादीने नकार दिल्याने तिच्या पतीला व मुलांना गाडीने अपघात करण्याची धमकी दिल्याने फिर्यादी हिला आरोपीने एमएच—३१/ईऐ—२१२६ क्रमांकाची चार चाकी तवेरा गाडीमध्ये बसवुन रामटेक रोडच्या मिर्नवा बारच्या मागे पळीत जागेवर नेउन गाडीमध्ये मारपीट करून बळजबरी ने शारीरिक संबध केले व हातबुक्कीने मारहाण करून 'तु जर याबद्‌दल कोणाला सांगितले तर तुला मारून टाकीन' अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७६, ३७६(२)(एन), ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार चौधरी मो.क्र. ७०३८८२२२०५ हे करीत आहे.

## चोरी

**१) पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील सावनेर ते खापा रोड येथे फिर्यादी नामे– मनोज चंद्रपाल पंकज, वय ३५ वर्ष, रा. गुजरखेडी, वार्ड क्र. १, प्लॉट नं १८३/६ ता. सावनेर यांचे जेबी टायर्स नावाची फॅक्टरी असुन तेथे टायर रिमोल्ड करण्याचे काम करतात. दि. १०/१०/२०२२ रोजी सकाळी ०९.०० वा. सुमारास फिर्यादी हे आपल्या कंपनीमध्ये गेले असता त्या कंपनी मध्ये ठेवलेले १) क्युरींग बॅग ६ नग अंदाजे किमत १०,०००/–रु., २) डिक्स सेट ५ नग अंदाजे किमंत ५,०००/–रु., ३) जॅक ३ नग किमंत १०,०००/–रु., ४) रासपिंग मशीन १ नग किमंत १५,०००/–रु., ५) रबर बेल्ट किमंत १०,०००/–रु. असा एकुण कि. ५०,०००/–रुपयाचा मुद्देमाल दुकानात काम करणाऱ्या नौकर संशईत आरोपी नामे– नसिर अंन्सारी रा. मिरजानगर डोगरा जि. वैशाली बिहार याने चोरुन नेल्याने संशय असल्याने सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३८१ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ. राजेन्द्र यादव मो.क्र ९४२३६०२९८७ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. वेलतुर** :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील मौजा किन्ही शिवार येथे दिनांक २९/०९/२०२२ चे १०.०० वा. सुमारास आरोपी नामे– मोहन मधुकर ठवकर, वय अंदाजे ३८ वर्ष, रा.कुही ह.मू. सावनेर ता.कुही याने फिर्यादी नामे– सौ.वंदना राजु ठवकर, वय ४४ वर्ष, रा. किन्ही ह.मु.खापरखेडा वार्ड नं २ यांचे शेतातील २ एकर मधील संपूर्ण सोयाबीन सोंगून जमा करून थ्रेशर मशीन ने काढून सोयाबीन अंदाजे किंमती ५०,०००/–रु. चा मुद्देमाल चोरुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. वेलतुर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार मधुकर सुरपाम मो.नं. ९४६४७१५६५८ हे करीत आहे.

## अज्ञात आरोपी कडून शेताला आग

**पो.स्टे.वेलतुर**:– अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील मौजा सोनपुरी शिवार येथे दिनांक १०/१०/२०२२ चे १७.३० वा. ते १९.०० वा. फिर्यादी नामे– सुधाकर राजेराम गाढवे, वय ४६ वर्ष, रा.सोनपूरी, ता.कुही याने आपले ४ एकर शेतामधील सोयाबिनचे पिक सोंगून शेतामध्येच ठेवले होते. शेतातील संपुर्ण सोयाबिनचा ढिग शेताचे मध्यभागी लावून व त्यावर ताडपत्री झाकून आपले घरी निघून गेले असता अज्ञात आरोपीने त्या सोयाबिनच्या गंजीला आग लावून जळाल्याने अंदाजे १५ ते २० कट्टे सोयाबिन किंमती ४५,०००/–रु. च्या पिकाचे नुकसान केलेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतुर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४३५ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री नितेश डोर्लिकर मो.नं. ९५९५६७८२३४ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. देवलापार** :– अंतर्गत ०८ कि. मीं अंतरावरील मौजा चिंधई माता मंदिर पवनी शिवार एन.एच ४४ हायवे रोड येथे दिनांक ०६/१०/२२ चे १३.०० वा. ते १४.०० वा. सुमारास मृतक/आरोपी नामे– सत्येंन्द्र कुमार दिवानसिंग धुर्वे, वय ३२ वर्ष, रा. खमरिया जि. शिवनी खंडवा, मध्यप्रदेश हा आपली एम.पि– २२/एमएम–१८७८ क्रमांकाच्या मोटरसायकलने स्वता: चालवित नागपुर वरून जबलपुर रोडणे आपले गावाकडे भरधाव वेगाने व निष्काळजीपणे जात असता चिंदाई मातामंदिर पवनी जवळ गाडीने स्लिप होवुन पडल्याने त्याच्या चेहेऱ्याला व डोक्याला मार लागला. त्यास उपचाराकामी प्रथम ग्रामीण रूग्णालय देवलापार व नंतर मेडिकल कॉलेज ट्रामा सेंटर नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावला.

सदर प्रकरणी सरतर्फ पोलिस नाईक दिलीप टेकाम पो.स्टे. देवलापार यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि घोडके मो.नं,८१७७९०७००४ या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**